**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# नियमित कर्जव्यवहाराचे नियम
## (दि.१०/०१/२०२२ पासुन लागू)

१) बँकेच्या पोटनियम क्र. ५१ प्रमाणे असलेल्या तरतुदीस अनुसरुन सभासदांना कर्ज देण्यात येईल.

२) कर्जासाठी बँकेच्या छापील नमुण्यातीलच अर्ज स्विकारले जातील. अर्जासोबत कर्जदार व जामीनदार यांचे फोटो देणे आवश्यक राहील.

३) सदर कर्जास फक्त नियमित सभासद व बँकेचे कायम सेवेतील अधिकारी व कर्मचारी पात्र राहतील. वैयक्तिक कर्जाची मर्यादा खालील प्रमाणे राहील.

**(अर्जदार सभासद झालेनंतर पुर्ण होणाऱ्या कालावधीकरीता )**

| अ. क्र. | सभासद होवुन पुर्ण झालेला कालावधी | कर्ज मर्यादा रक्कम |
|---|---|---|
| १ | सभासद होवुन १ वर्षापर्यंत (कार्यालयातुन पहिली वर्गणी कपात होणे आवश्यक राहील. त्यानंतरच विचार केला जाईल.) | ७ लाख |
| २ | १ वर्ष पुर्ण झालेपासुन २ वर्षापर्यंत | १० लाख |
| ३ | २ वर्ष पुर्ण झालेनंतर | १५ लाख |

(कर्ज परतफेडीच्या कुवतीनुसार)

४) कर्जाच्या परतफेडीची मुदत कर्ज घेतल्यापासुन कमाल १२ वर्षे इतकी राहील तसेच ती कोणत्याही परिस्थितीत सेवानिवृत्ती तारखेपेक्षा अधिक कालावधीसाठी राहणार नाही. कर्ज रक्कमेनुसार खालीलप्रमाणे स्टॅम्प पेपर आवश्यक राहतील.

| अ. क्र. | कर्ज रक्कम | आवश्यक स्टॅम्प पेपर |
|---|---|---|
| १ | १ लाख पावेतो | रु.१०० |
| २ | १ लाखाचेवर ते २ लाख | रु.२०० |
| ३ | २ लाखाचेवर ते ३ लाख | रु.३०० |
| ४ | ३ लाखाचेवर ते ४ लाख | रु.४०० |
| ५ | ४ लाखाचेवर ते ५ लाख | रु.५०० |
| ६ | ५ लाखाचेवर ते ६ लाख | रु.६०० |
| ७ | ६ लाखाचेवर ते ७ लाख | रु.७०० |
| ८ | ७ लाखाचेवर ते ८ लाख | रु.८०० |
| ९ | ८ लाखाचेवर ते ९ लाख | रु.९०० |
| १० | ९ लाखाचेवर ते १० लाख | रु.१००० |
| ११ | १० लाखाचेवर ते ११ लाख | रु.११०० |
| १२ | ११ लाखाचेवर ते १२ लाख | रु.१२०० |
| १३ | १२ लाखाचेवर ते १३ लाख | रु.१३०० |
| १४ | १३ लाखाचेवर ते १४ लाख | रु.१४०० |
| १५ | १४ लाखाचेवर ते १५ लाख | रु.१५०० |

५) सदर कर्जाच्या व्याजाचा दर द.सा.द.शे.११.५०% प्रमाणे राहील. सदरचा व्याजदर हा जुन्या व नविन अशा दोन्हीही कर्जास लागु होईल. व्याजाची रक्कम रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणे मासिक पद्धतीने खातेवर नावे टाकली जाईल. सदरचे कर्जावरील व्याजाचा दर कमी करणेचा अथवा वाढविणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

६) वाढीव कर्ज मर्यादा मंजुरीसाठी पगारातुन नियमित कर्ज हप्त्याची परतफेड करणारा अथवा मागील परतफेडीचा अनुभव चांगला असणारा सभासदच पात्र असेल.

७) कर्जाचा हप्ता कर्ज उचल तारखेपासुन एक महिन्याने सुरु होईल मात्र प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या तारखेच्या आत कर्जदाराने कर्ज हप्ता भरावयास पाहीजे. तसे न झाल्यास तो हप्ता थकीत झाला असे समजले जाईल. सदर थकीत रक्कमेवर २% दंड व्याज आकारण्यात येईल.

८) कर्ज अदा करतेवेळी घेतलेल्या कर्जाचा एक हप्ता अगाऊ कर्ज घेतेवेळीच कपात करण्यात येईल.

९) नवीन सभासदास कर्ज मंजुर करतांना त्याची किमान एक महिन्याची वर्गणी पगारातुन कपात होवुन बँकेंस प्राप्त झालेली असणे आवश्यक राहील.

१०) कर्जाच्या रक्कमेची उचल केल्यानंतर एक महिन्याच्या आत संपुर्ण कर्ज रक्कमेचा भरणा केल्यास किमान एक महिन्याचे नियमित दराने व्याज आकारले जाईल.

११) अगोदर कर्ज घेतले असल्यास सदरचे कर्ज घेवुन किमान ६ महिने पुर्ण झालेले सभासदच नविन कर्ज मागणीस पात्र राहतील.

१२) कर्ज घेऊन सहा महिने पुर्ण करणाऱ्या नियमित कर्जदार सभासदाची जुन्या कर्ज खात्याची येणेबाकी नविन कर्जातुन वजावटीने कपात करुन उर्वरीत रक्कमच त्याच्या बचत खात्यावर जमा करण्यात येईल किंवा सभासदाच्या मागणीनुसार कर्ज रक्कम चेक, एन.ई.एफ.टी. अथवा आर.टी.जी.एस. ने अदा करण्यात येईल.

१३) कर्जासाठी दोन जामीनदार आवश्यक राहतील. मात्र जामीनदार राहु इच्छिणाऱ्या सभासदाकडे कर्जदार व जामीनदार या नात्याने थकबाकी असल्यास त्याची जामीनकी स्विकारली जाणार नाही. एक सभासद जास्तीत जास्त तीन सभासदास जामीनदार म्हणुन चालु शकेल.

१४) मंजुर कर्ज रक्कमेचा विमा उतरविणे कर्जदारास बंधकारक राहील. सदरचा विमा हप्ता कर्ज खातेवर नावे टाकुन बँकेमार्फत अदा केला जाईल. सदरची रक्कम देण्याची जबाबदारी कर्जदाराची राहील.

१५) ज्या सभासदाची वेतनातुन कपात येत नाही अशा सभासदास कर्ज मंजुरीसाठी ECS / ACH करुन देणे आवश्यक राहील. सदरचा ECS / ACH पास न झाल्यास नियमानुसार 'दंड' म्हणुन रक्कम खातेवर नावे टाकली जाईल.

१६) ज्या कर्जदार सभासदाने कर्ज खाते ६ महिनेचे आत पुर्ण रक्कम भरुन बंद केले असेल अशा सभासदास नवीन कर्ज मंजुरीसाठी पहिले कर्ज घेवुन ६ महिनेचा असलेला कालावधी लागू राहणार नाही.

१७) काही कारणाने कर्जदारास जामीनदारात बदल करावयाचा असल्यास त्याबाबतची नियमाप्रमाणे सर्व पुर्तता करुन देणे कर्जदारास बंधनकारक राहील.

१८) थकीत कर्जाची रक्कम वसुल करणेकामी योग्य ती कायदेशिर कारवाई करणेत येईल व त्यासाठी होणाऱ्या खर्चाची व परिणामाची सर्वस्वी जबाबदारी कर्जदार व जामीनदार यांच्यावर वैयक्तिक व संयुक्तिक राहील.

१९) मासिक भरावयाच्या वर्गणीची रक्कम ५००/- रु इतकी राहील. सदरची रक्कम 'वर्गणी कायम ठेव' या खात्यात जमा केली जाईल. मात्र सभासदास जादा रक्कम भरावयाची असल्यास त्यास ती भरता येईल. सदरची रक्कम कर्ज हप्त्याबरोबर मागणी केली जाईल व प्रथम वर्गणी जमा करुन उर्वरीत रक्कम शैक्षणिक व नियमित कर्ज हया क्रमाने कर्ज खात्यात जमा करण्यात येईल.

२०) कर्जदार सभासदाकडील थकीत रक्कम त्यांचे बँकेतील बचत तसेच इतर कोणत्याही ठेव खात्यातुन नावे टाकुन वर्ग करणेचा अधिकार बँकेस राहील. तसेच ज्या ज्या रक्कमा कर्जदारास देय असतील त्या देखील कर्जापोटी वर्ग करण्याचा अधिकार बँकेस राहील.

२१) मंजुर केलेल्या कर्जाची रक्कम उचल करण्यापुर्वी बँकेने नमुद केलेला करारनामा, वचनचिठ्ठी, चेक्स्, खाते उतारा, फोटो व अन्य आवश्यक दस्तऐवज अर्जदार व जामीनदार या नात्याने बँकेच्या कार्यालयात भरुन दिले पाहीजे त्याबाबत संबधीताची खात्री व सर्व बाबींची पुर्तता झाल्यानंतरच कर्जाची रक्कम अदा केली जाईल.

२२) कर्ज संपुर्णपणे अथवा अंशत: मंजुर करणेचा अथवा नामंजूर करण्याचा अधिकार बँकेस राहील, मात्र कर्ज नामंजुर करणेचे कारण अर्जदारास लेखी स्वरुपात दिले जाणार नाही.

२३) कर्जदार व जामीनदार यांनी त्यांचा निवासी (राहण्याचा) अथवा नोकरीचा पत्ता तसेच दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक बदलला तर ८ दिवसाच्या आत बदललेला पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक बँकेस लेखी स्वरुपात कळविणे बंधनकारक राहील.

२४) सदर कर्जाची परतफेड ही वरीलप्रमाणे नमुद असली तरी सलग तीन हप्ते थकल्यास त्याची येणे रक्कमेची संपुर्णपणे मागणी करणेचा हक्क बँकेस राहील. अशा वेळी परतफेडीच्या कालावधीचा विचार केला जाणार नाही.

२५) अशी कर्ज जिल्हा परिषद व राज्य सरकारी खात्यातील कार्यरत असणाऱ्या सभासदास पगाराच्या हमीवर दिली जातात. त्यासाठी अर्जदाराने नोकरी करीत असलेल्या कार्यालयातील खातेप्रमुख अथवा आंहरण व संवितरण अधिकाऱ्याकडुन दरमहा मिळत असलेल्या नजीकचा पगाराचा दाखला बँकेच्या छापील नमुण्यात सादर केला पाहीजे. पगाराच्या दाखल्यावर ज्या जबाबदार अधिकाऱ्याची स्वाक्षरी घेणे आवश्यक आहे त्याचीच स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहील, याची संपुर्ण जबाबदारी कर्जदाराची राहील.

२६) सभासदाने यापुर्वी कर्ज घेतले असल्यास सदरचे खाते नियमित असावे तसेच तो इतर कर्जास जामीनदार असल्यास सदरचे खाते थकबाकीत नसावे.

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

**प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.**

२७) कर्ज अदा करणेपुर्वी सभासदांनी त्याने उचललेल्या रक्कमेच्या ५% ही शेअर्स मध्ये व १५% रक्कम कर्ज परत फेडीच्या कालावधी इतक्या 'कायम मुदत ठेवी' मध्ये जमा करणे आवश्यक राहील. कायम ठेवीची रक्कम ही त्याने यापुर्वी केलेल्या व नवीन अशी एकत्रित करुन ती कर्ज रक्कमेच्या १५% होणे आवश्यक आहे. सभासदाच्या वरिल दोन्ही खात्यातील जमा रक्कमेच्या पाच पट इतकीच रक्कम कर्ज म्हणुन दिली जाईल.

२८) कर्जदार सभासदाच्या थकीत रक्कमेच्या वसुलीसाठी नोटीसा पाठविणे, वाहन खर्च, वकील फी, सरचार्ज व इतर कायदेशिर खर्च त्याचे खातेवर नावे टाकण्यात येईल व तो प्रथम वसुल केला जाईल तसेच खाते थकबाकीमुळे जे दंड व्याज लागेल ते भरण्याची जबाबदारी कर्जदार सभासदाची राहील.

२९) कर्ज रक्कमेसाठी आवश्यक असणारी स्टॅम्प ड्युटी कर्जदारास स्वत:ला भरावी लागेल स्टॅम्पड्युटीत होणाऱ्या बदलास तो वैयक्तिक जबाबदार राहील व त्याची भरपाई करुन द्यावी लागेल.

३०) सभासदाने पगार जमा होणाऱ्या बँक खात्याचे

अ) रु. १,००,०००/- पावेतो कर्ज मंजुरीसाठी - २ चेक व

ब) रु. १,००,०००/- चे वरील कर्जासाठी - ५ चेक

तसेच कर्ज अर्ज तारखेपासुन सहा महिने मागील मुदतीचा खाते उताऱ्याची (A/C Statement) छायांकित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहिल.

३१) कर्जदाराचे हप्ते थकल्यास बँकेच्या नियमाप्रमाणे थकीत रक्कम वसुलीसाठी कायदेशिर कारवाई करण्याचे संपुर्ण अधिकार व हक्क बँकेने राखुन ठेवलेले आहेत.

३२) कर्जाची रक्कम ही बचत खात्यावर जमा करुन अदा केली जाईल. त्यामुळे प्रत्येक सभासदाचे बचत खाते बँकेत असणे आवश्यक राहील. सभासदाने मागणी केल्यास चेकने देखील रक्कम अदा करण्यात येईल, मात्र बचत खाते बँकेत असणे आवश्यक राहील.

३३) सभासदाने बचत खात्यासाठी रिझर्व्ह बँकेने ठरवुन दिल्याप्रमाणे KYC प्रमाणे सर्व पुर्तता करुन दयावी लागेल. बचत खात्यावर KYC प्रमाणे पुर्तता झाली नसल्यास सदर खात्यावरील व्यवहार गोठविण्यात येईल, याबाबतचा संपुर्ण अधिकार बँकेस राहील.

वरील नियमात काहीही नमुद केलेले असले तरी सदर कर्जाचा व्यवहार हा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे कडुन वेळोवेळी येणाऱ्या आदेशांना अनुसरुन राहील व त्याप्रमाणे वरील नियमात फेरफार करण्याचा तसेच नवीन नियम घालण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

**संचालक मंडळ सभा दि.०८/०१/२०२२ विषय क्र. १५ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.१०/०१/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(सुरेश पाटील)** | **(अशोक शिंदे)** | **(भाऊसाहेब खातळे)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.


## 'तात्काळ' कर्जाचे नियम
## (फक्त वैद्यकीय व शैक्षणिक कारणासाठी)
## (दि.१०/०६/२०१८ पासुन लागू)

१. सदर नियमास **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक'** चे **'तात्काळ कर्ज'** (Emergency Loan) **वैद्यकीय** व **शैक्षणिक** कारणासाठी असे संबोधले जाईल.

२. सदर कर्ज फक्त नियमित सभासदास देण्यात येईल तसेच बँकेचा कायम सेवक देखील सदर कर्ज घेण्यास पात्र राहील तथापि त्यास नाममात्र सभासद व्हावे लागेल.

३. सदरचे कर्ज फक्त वैद्यकीय उपचार व शैक्षणिक कारणासाठीच दिले जाईल.

४. वैद्यकीय उपचारासाठीच्या लागणाऱ्या खर्चाबाबतचे हॉस्पीटल किंवा डॉक्टरचे तसेच शैक्षणिक कारणासाठी संबंधीत शाळा / महाविद्यालय यांचे फी बाबतचे पत्र कर्ज अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

५. मंजूर कर्जाची रक्कम परस्पर हॉस्पीटल / डॉक्टर / शाळा / महाविद्यालय यांचे नावाने चेकने अथवा NEFT ने पाठविण्यात येईल ती कोणत्याही परिस्थितीत रोखीने अथवा बचत खातेवर जमा केली जाणार नाही.

६. सदरचे कर्ज उपचारासाठी येणारा खर्च किंवा शैक्षणिक फी व रु.२५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्याच रक्कमेस कर्ज मंजुरी दिली जाईल.

७. किमान रु. ५,०००/- इतके भाग भांडवल असणारे व नियमीत वर्गणी चालू असणारे सभासदच हे कर्ज घेण्यास पात्र राहतील.

८. कर्जाची मर्यादा किमान रु.५,०००/- व कमाल रु.२५,०००/- इतकी राहील.

९. ज्या सभासदाने यापुर्वी फक्त तात्काळ कर्ज घेतलेले आहे आणि आता नवीन मुदत कर्जाची मागणी केली आहे अशा सभासदास अगोदरचे तात्काळ कर्ज खाते पुर्ण व्याजासह भरुन बंद करावे लागेल किंवा नवीन मुदत कर्जाच्या वजावटीतुन देखील तात्काळ कर्ज बंद करण्यात येईल.

१०. कर्जाची परतफेडीची मुदत २४ महिने इतकी राहील, सदरची मुदत कोणत्याही परिस्थितीत सभासदाच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपेक्षा जादा राहणार नाही. सदरची परतफेड मासिक हप्त्याने राहील. सदरचा मासिक हप्ता पगारातुन कपातीसाठी कार्यालयाकडे पाठविला जाईल.

११. कर्जाचा व्याजदर नियमित कर्जाइतका म्हणजे द.सा.द.शे. ११.५०% इतका राहील. व्याज मासिक स्वरुपात खात्यावर नावे टाकले जाईल. कर्ज थकीत झाल्यास थकीत रकमेवर २% जादा 'दंड' व्याज आकारले जाईल.

१२. कर्जास जामीनदाराची आवश्यकता नाही मात्र सभासदाने यापुर्वी कर्ज घेतले असल्यास सदरचे कर्ज नियमित असावे. ते थकीत असल्यास हे कर्ज दिले जाणार नाही.

१३. रु. ८ लाख नवीन मुदत कर्ज घेतलेल्या सभासदास सदर कर्जावरील येणे बाकी व त्या कर्जाची मंजुर रक्कम यातील फरक व कमाल मर्यादा रु.२५,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितकीच रक्कम तात्काळ कर्ज म्हणुन दिली जाईल आणि ती कोणत्याही परिस्थितीत रु.२५,०००/- (रु.पंचवीस हजार मात्र) पेक्षा जादा असणार नाही.

१४. कर्जास रु.१००/- चा स्टॅम्प पेपर कर्ज करारनाम्यासोबत स्वाक्षरीनीशी जोडावा लागेल.

१५. कर्ज मुदतीत न भरल्यास अथवा थकीत झाल्यास ते सभासदांच्या इतर ठेव खात्यातुन वर्ग करुन बंद करण्यात येईल याबाबतचा हक्क बँकेकडे राहील.

१६. कर्ज मंजुरी वेळी मागील कर्जाच्या परतफेडीचा अनुभव विचारात घेण्यात येईल. सदरचा अनुभव समाधान कारक नसल्यास कर्ज मंजुरी दिली जाणार नाही.

१७. सदरचे कर्ज सभासदाच्या वैद्यकीय व शैक्षणिक कारणासाठी तात्काळ देण्यात येत असल्याने नियमाप्रमाणे पुर्तता करुन देणाऱ्या नियमित सभासदास अथवा बँक कर्मचाऱ्यास हे कर्ज बँकेच्या कोणत्याही शाखेतुन घेता येईल.

१८. सदर कर्ज **मंजुर/नामंजुर** करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील. मात्र कर्ज नामंजुरीबाबतचे कारण सभासदास लेखी स्वरुपात दिले जाणार नाही.

**सदर कर्ज नियमावली संचालक मंडळ सभा दि.०९/०६/२०१८ ठराव क्र. १४(०८) अन्वये मंजुर करण्यात येत असुन दि. १०/०६/२०१८ पासुन ही नियमावली लागु राहील.**

| (प्रकाश क्षीरसागर) | (दिपक आहिरे) | (दिलीप थेटे) |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# वैद्यकीय कर्ज नियमावली

१. सदर नियमांस **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक'** या बँकेचे **'वैद्यकीय कर्ज'** असे नांव राहील.

२. बँकेचा नियमित सभासद वैद्यकीय कर्जास पात्र राहील.

३. अर्जदार सभासद नियमित खातेदार असावा, तसेच तो थकीत कर्जास जामीनदार नसावा.

४. सदर कर्जास दोन सक्षम जामीनदार दयावे लागेल.

५. सभासद स्वत: किंवा त्यांचे कुटूंबातील व्यक्ती (पती, पत्नी किंवा २५ वर्षे वयाखालील मुले) यांच्या वैद्यकीय उपचारासाठी औषधासह येणाऱ्या खर्चासाठी सदरचे कर्ज मंजुर केले जाईल. सदरचे कर्ज कोणत्याही आजारासाठी दिले जाईल मात्र संबंधीत आजारी व्यक्ती दवाखाण्यात ॲडमीट असणे आवश्यक आहे.

६. सदरचे कर्ज सभासदांच्या मुलांसाठी किंवा पती / पत्नीच्या औषधोपचारासाठी देण्यात येत असते तरी हे कर्ज सभासदाच्या नावावरच देण्यात येईल.

७. उपचारासाठीचा होणारा खर्च अथवा कमाल रु. १.५० लाख यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्या रकमेपावेतो वैद्यकीय कर्ज मंजुर केले जाईल. सदरची रक्कम हॉस्पीटल / मेडीकल यांच्या नावाने चेक / NEFT व्दारे अदा करण्यात येईल ती कोणत्याही परिस्थितीत रोख स्वरुपात किंवा खात्यावर जमा केली जाणार नाही.

८. सदरच्या कर्जाची किमान कर्ज मर्यादा रु.२०,०००/- इतकी आहे. रु.२०,०००/- चे आतील वैद्यकीय उपचारासाठी हे कर्ज दिले जाणार नाही.

९. सदर कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. १२% इतका राहील. खाते थकीत झाल्यास थकीत रक्कमेवर २% इतक्या दराने दंड व्याज आकारण्यात येईल. सदरचे व्याज मासिक पध्दतीने खात्यावर नावे टाकले जाईल.

१०. वैद्यकीय कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुण्यातील अर्ज, हॉस्पिटलचे अपेक्षित खर्चाबाबतचे प्रमाणपत्र, आजाराचे निदान झाल्याबाबतचे पत्र इत्यादी सर्व कागदपत्राची पुर्तता करुन बँकेकडे सादर करावे लागेल नंतरच अंतिम मंजुरी दिली जाईल. सदर कर्जासाठी नियमाप्रमाणे ५% शेअर्स व १५% कायम वर्गणी ठेव असणे आवश्यक राहील.

११. सदर कर्जाची मुदत १२ महिने इतकी राहील. सदर मुदतीत रक्कम न भरल्यास सदरचे खाते थकीत समजले जाईल. सभासदास सदर कर्ज खात्यावर केव्हाही किंवा मासिक स्वरुपात रक्कम जमा करता येईल.

१२. वैद्यकीय कर्ज मंजुर / नामंजुर करणेचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखुन ठेवला आहे मात्र कर्ज नामंजुरी बाबतचे कारण सभासदास लेखी स्वरुपात दिले जाणार नाही.

१३. वरील नियमात फेरफार अथवा बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळाला राहील.

**वरील नियमावली संचालक मंडळ सभा दि.२५/१२/२०१६ विषय क्र. ११ अन्वये मंजुर. सदर निर्णयाची अंमलबजावणी दि. ०१/०१/२०१७ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(प्रकाश क्षीरसागर)** | **(शिरीष भालेराव)** | **(भाऊसाहेब खातळे)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

## सभासदांच्या मतीमंद पाल्यांसाठी
## 'मतीमंद पाल्य कर्ज योजना' नियमावली

१. सदर नियमास **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक'** या बँकेचे **'मतीमंद पाल्य कर्ज योजना '** असे नाव राहील.
२. कर्ज मागणी करणारा सभासद हा सभासद होवुन पाच वर्ष पुर्ण झालेला असावा.
३. कर्जाची कमाल मर्यादा रु.१,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र) इतकी राहील.
४. एका सभासदास या कर्जासह (नियमित मुदत कर्ज, शैक्षणिक कर्ज व वैद्यकीय कर्ज) असे सर्व कर्जे मिळून कमाल रु. ४ लाख अथवा त्याच्या परतफेडीच्या कुवतीनुसार बसेल इतकेच कर्ज मंजूर केले जाईल.
५. मतीमंद पाल्य हा ५०% किंवा त्यापेक्षा जादा मतिमंद असल्याबाबतचे **'मेडिकल बोर्डाचे'** (वैद्यकिय मंडळाचे) सर्टिफिकेट कर्ज अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.
६. सदर कर्जाचा व्याजदर ११% इतका राहील मात्र कर्ज थकबाकीत गेल्यास, सदरचे कर्जास नियमित कर्जाचे दराप्रमाणे व्याज आकारण्यात येईल.
७. कर्जासाठी परतफेड कालावधी ३ वर्षाचा राहील. कर्ज मंजुरीसाठी सभासदांची किमान ३ वर्षे सेवा शिल्लक असणे आवश्यक आहे.
८. कर्जाची परतफेड कर्ज उचल तारखेच्या पुढील महिन्यापासुन लगेचच मासिक हप्ता पद्धतीने सभासदाचे पगारातून चालू होईल.
९. मतीमंद पाल्यांसाठीच कर्ज रक्कम वापरणेचे हमीपत्र घेऊन सभासदाचे नांवाने सदर कर्ज अदा केले जाईल.
१०. कर्जासाठी दोन जामीनदार, कर्ज रकमेच्या ५% शेअर्स व १५% वर्गणी ठेव जमा करणे आवश्यक राहील.
११. सभासदांच्या पाल्य या संकल्पनेत सभासदाचा पती, पत्नी, मुलगा अथवा मुलगी यांचाच फक्त समावेश राहील.
१२. सदरचे कर्ज तीन वर्षातुन एकदाच घेता येईल.
१३. सदरचे कर्ज मंजुरीपुर्वी सभासदांच्या हातात सदर कर्जाचा होणारा हप्ता धरुन किमान १/३ वेतन हातात मिळणे आवश्यक आहे.
१४. वरील नियमात फेरफार अथवा बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील.

**कार्यकारी मंडळ सभा दि. २२/१२/२०१३ ठराव क्र. १५ अन्वये 'मतीमंद पाल्य कर्ज योजना ' नियमावली मंजुर करणेत येत असुन सदर नियमांची अंमलबजावणी त्वरीत लागु करणेत येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(प्रकाश क्षीरसागर)** | **(बाळासाहेब ठाकरेपाटील)** | **(भाऊसाहेब खातळे)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# शैक्षणिक कर्ज नियमावली

१) शैक्षणिक कारणासाठी कर्ज मागणी केल्यास त्यास बँकेचे **'शैक्षणिक कर्ज'** असे संबोधले जाईल.

२) कर्ज मागणी करणारा सभासद हा सभासद होवुन किमान १ वर्ष पुर्ण झालेले असावा व तो थकबाकीदार नसावा तसेच त्याचा मागील कर्जाच्या परतफेडीचा अनुभव चांगला असावा.

३) सदर कर्जास दोन थकबाकीदार नसलेले **'नियमित'** सभासद जामीनदार द्यावे लागतील.

४) बँकेच्या विहीत नमुन्यातील पुर्ण भरलेले कर्ज अर्जासोबत फॉर्म फी रु.५०/- व स्टॅम्पपेपर कर्ज रकमेनुसार जोडणे आवश्यक आहे. रु.१ लाखापर्यंतच्या कर्जासाठी रु.१००/-, १ लाखाचे वर व २ लाखापर्यंत रु.२००/- आणि २ लाखाचे वर व ३ लाखापर्यंत रु.३००/- रुपयांचे स्टॅम्पपेपर लागेल.

५) कर्ज मागणी अर्जासोबत कर्जदार सभासद, त्याचे पाल्य व दोन्ही जामीनदार यांचे फोटो जोडणे अत्यावश्यक आहे.

६) सभासदांचे वेतनपत्रकाप्रमाणे सर्व प्रकारची कपात वजा जाता १/३ वेतन हातात पडणे आवश्यक आहे.

७) या कर्जाची कमाल कर्ज मर्यादा रु.३,००,०००/- इतकी असेल मात्र **'शैक्षणिक फी'** व **'कर्ज मर्यादा'** या पैकी जी रक्कम कमी असेल तेवढेच कर्ज मंजुर केले जाईल.

८) सदर कर्ज योजना सभासदांचे 'विवाहीत' व 'अविवाहीत' अशा दोन्ही पाल्यांसाठी असुन पाल्य हया संज्ञेत मुलगा व मुलगी व तसेच त्यांची मुले / मुली (नातु / नात) यांचा समावेश राहील.

९) कर्जदार सभासदाने बँकेकडुन एकुण घेतलेल्या कर्जाच्या ५% शेअर्स असणे अनिवार्य राहील.

१०) शैक्षणिक कर्ज मागतेवेळी आपल्या पाल्यांचे **'गुणपत्रक'** तसेच ज्या शासनमान्य शिक्षण संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे, त्यांचे फी बाबतचे तपशिल दर्शविणारे **'माहिती पत्रक'** व **'मागणी पत्र'** सोबत जोडणे आवश्यक आहे.

११) शैक्षणिक कर्जासाठी आपल्या पाल्यांचा प्रवेश शासनमान्य संस्थेत निश्चित झालेला असणे अत्यावश्यक आहे. सदरची कर्ज योजना सर्व शासनमान्य शैक्षणिक प्रवेशासाठी लागु राहील.

१२) ही योजना संपुर्ण वर्षभरासाठी लागु राहील.

१३) मंजुर कर्जाची रक्कम परस्पर ज्या शासनमान्य शैक्षणिक संस्थेत प्रवेश घ्यावयाचा आहे तेथे चेक, NEFT / RTGS ने पाठविली जाईल. सदरची रक्कम कोणत्याही परिस्थीतीत खात्यावर जमा करुन अथवा रोखीने दिली जाणार नाही.

१४) शैक्षणिक कर्जाचा एकदा लाभ घेतल्यानंतर पुनश्च कर्ज घ्यावयाचे झाल्यास रु. तीन लाखा पावेतोच्या मर्यादेपर्यंत नवीन शैक्षणिक कर्ज मंजुरीबाबत विचार केला जाईल. शैक्षणिक कर्ज मंजुरीसाठी अगोदरचे शैक्षणिक कर्ज येणे बाकी व नवीन भरावयाची फी अशा दोन्ही बाबींचा विचार करण्यात येईल. नवीन कर्ज मंजुरीनंतर जुने कर्ज वजावटीने वसुल करुन घेवुन उर्वरीत रक्कम शैक्षणिक संस्थेच्या नावाने अदा करण्यात येईल.

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

**प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.**

१५) कर्ज वितरणानंतर कर्जाची परतफेड तात्काळ समान ४८ मासिक हप्त्यात EMI पध्दतीने (व्याजासह) केली जाईल. कर्जाचा व्याज दर १०.५०% इतका राहील. फक्त नियमित कर्जफेड करणाऱ्यास या व्याजदराचा लाभ मिळेल. सदरचा व्याजदर हा जुन्या व नवीन अशा दोन्ही कर्जदार सभासदांसाठी लागु राहील. कर्ज थकल्यास थकीत रकमेवर २% दंडव्याज म्हणुन आकारणी केली जाईल.

१६) सदर कर्जाचे सुरक्षिततेसाठी ५ चेक्स दयावे लागतील.

१७) सदर कर्जास पगारवाटप अधिकारी यांची लेखी हमी असणे आवश्यक आहे.

१८) व्हाईटनर लावलेला कर्ज अर्ज कोणत्याही परिस्थीतीत स्विकारला जाणार नाही.

वरील नियम व अटीत बदल करणेचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखुन ठेवलेला आहे तसेच शैक्षणिक कर्ज मंजुर / नामंजुर करणेचा अधिकार बँकेच्या संचालक मंडळास राहील मात्र कर्ज नामंजुर करणेचे कोणतेही लेखी कारण सभासदास कळविले जाणार नाही.

**वरील नियमावली संचालक मंडळ सभा दि.२०/०८/२०१७ विषय क्र. १२ अन्वये मंजुर. सदर निर्णयाची अंमलबजावणी त्वरीत लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(प्रकाश क्षीरसागर)** | **(शिरीष भालेराव)** | **(भाऊसाहेब खातळे)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# सोने तारण कर्ज नियमावली

**(दि.०१/०९/२०२१ पासुन लागु)**

१) सदर नियमांस **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक या बँकेचे 'सोने तारण कर्ज'** असे संबोधण्यात येईल.

२) सदरचे कर्ज फक्त नियमित सभासद व बँकेच्या कायम सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येईल.

३) कर्ज कमाल मर्यादा

योजना नं. १

i) कर्ज मर्यादा रु.२.०० लाख पर्यंत.

ii) परतफेड - १ वर्षात (Bullet Repayment)

योजना नं. २

i) कर्ज मर्यादा रु.१ ते ५ लाख पर्यंत.

ii) परतफेड - मासिक हप्त्याने ३ वर्षापर्यंत

४) कर्जदारास वरील कर्जमर्यादा योजनांचा एका वेळेस एकच योजनेचा लाभ घेता येईल.

५) योजना नं.१ मध्ये कर्जाची मुदत संपल्या नंतर ३० दिवसांच्या आत खाते बंद न केल्यास व योजना नं.२ मधील कर्ज खाते NPA झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत खाते नियमित न केल्यास कर्जदारास नोटीस देवुन जाहीर लिलावाव्दारे तारण सोनेदागिन्यांची विक्री करुन कर्ज रक्कम वसुल केली जाईल.

६) कर्ज वसुली करीता येणारा खर्च कर्ज खात्यावर नावे टाकुन 'वसुल' करण्यात येईल.

७) कर्जदारास कर्जमागणी करतेवेळी सोन्याचे दागिणे स्वमालकीचे असल्याबाबत बँकेच्या नमुन्यात हमीपत्र देणे आवश्यक आहे.

८) चोख सोन्यावर सराफाने केलेल्या एकुण मुल्याकनांच्या ७० टक्के इतके कर्ज दिले जाईल.

९) या कर्जावर मंजुर व्याजदराप्रमाणे व्याज आकारले जाऊन ते मासिक स्वरुपात खात्यावर नावे टाकले जाईल हे व्याज खातेदाराने ताबडतोब भरले पाहीजे. खातेदाराने एक महिनेचे आत पूर्ण रक्कम भरल्यास कमीत कमी एक महिन्याचे व्याज आकारले जाईल.

१०) बँकेने नेमलेल्या अधिकृत सराफाकडून तारण मालाचे मुल्यांकन केले जाईल व त्याची फी कर्जदाराने दिली पाहीजे.

११) कर्जदाराला या कर्जाबाबत बँकेकडे 'वचनचिठ्ठी व सोनेतारण' करारनामा करुन दयावा लागेल तसेच आवश्यक ते दस्तऐवज सोबत जोडावे लागतील. माल ताब्यात मिळाल्याबद्दल बँक पोहोच पावती देईल.

१२) बँकेस तारण दिलेल्या मालाच्या बाजार भावाप्रमाणे दुरावा कमी झाल्यास आवश्यक ती रक्कम कर्जदाराने बँकेत त्वरीत भरणे आवश्यक आहे.

१३) माल विकून येणाऱ्या रकमेपैकी कर्ज भागवून शिल्लक रक्कम राहील्यास ती कर्जदारास परत केली जाईल व कमी असल्यास तेवढ्या रक्कमेबद्दल कर्जदार जबाबदार राहील.

१४) सदर कर्जाचा व्याजाचा दर द.सा.द.शे. १०% इतका राहील. तसेच व्याजाच्या दरात बदल करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळास राहील. बदललेला व्याजदर हा जुन्या व नविन अशा दोन्हीही कर्जास लागु होईल.

१५) सदर कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुण्यातील अर्ज, पूर्ण तपशिलासह माहीती व आवश्यक तेथे स्वाक्षऱ्या इ. परिपूर्ण करुन देणे आवश्यक राहील नंतरच कर्ज वितरीत केले जाईल. सदर कर्जासाठी आवश्यक त्या रकमेचा स्टॅम्प्स् कर्ज अर्जाला जोडावा लागेल. यात स्टॅम्प ॲक्ट कायदयानुसार वेळोवेळी जे बदल होतील ते बदल लागु राहतील.

१६) कर्जदाराचे सोने - तारणावरील कर्जाखेरीज अन्य तऱ्हेने बँकेचे देणे लागत असेल तर त्याकरिताही हा माल तारण म्हणुन समजण्याचा अधिकार बँकेस आहे व राहील.

१७) बँकेच्या कर्मचा-यांना सोनेतारणावर कर्ज घेता येईल. मात्र त्यांना 'नाममात्र' सभासद व्हावे लागेल. त्यांना देखील नियमित सभासदांप्रमाणे वरील नियम बंधनकारक राहतील. याबाबत इतर कुठलीही सुट अथवा सवलत मिळणार नाही.

वरील नियमात फेरफार करण्याचा तसेच नवीन नियम घालण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

**संचालक मंडळ सभा दि.३१/०८/२०२१ विषय क्र. १० अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.०१/०९/२०२१ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| (सुरेश पाटील) | (दिलीप सलादे) | (शिरीष भालेराव) |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

## 'शैक्षणिक साहित्य कर्ज नियम' (लॅपटॉप / संगणक / मोबाईल खरेदी)

## (दि.२५/०८/२०२० पासुन लागू)

१. सदर नियमास **'नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक'** चे **'शैक्षणिक साहित्य कर्ज' (Educational Equipment)** असे संबोधले जाईल.

२. सदर कर्ज फक्त नियमित सभासदास देण्यात येईल तसेच बँकेचा कायम सेवक देखील सदर कर्ज घेण्यास पात्र राहील तथापि त्यास 'नाममात्र' सभासद व्हावे लागेल.

३. सदरचे कर्ज शैक्षणिक कारणांसाठी लागणारे **लॅपटॉप, संगणक अथवा मोबाईल** खरेदीसाठी दिले जाईल.

४. शैक्षणिक कारणासाठी **लॅपटॉप, संगणक व मोबाईल** खरेदीबाबत संबंधीत विक्रेत्यांचे कोटेशन व संबंधीत पाल्याचे गुणपत्रक अर्जासोबत जोडावे लागेल.

५. मंजूर कर्जाची रक्कम परस्पर विक्रेता यांचे नावाने चेकने अथवा NEFT ने पाठविण्यात येईल ती कोणत्याही परिस्थितीत रोखीने अथवा बचत खातेवर जमा केली जाणार नाही.

६. सदरचे कर्ज वरील नमुद वस्तुंच्या कोटेशन रक्कमेनुसार किंवा रु.५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्याच रक्कमेस कर्ज मंजुरी दिली जाईल.

७. किमान रु. ५,०००/- इतके भाग भांडवल असणारे व नियमीत वर्गणी चालू असणारे सभासदच हे कर्ज घेण्यास पात्र राहतील.

८. कर्जाची मर्यादा किमान रु.५,०००/- व कमाल रु.५०,०००/- इतकी राहील.

९. सदर कर्जाची परतफेड ECS मार्फत करण्यात येईल. मात्र बँक कर्मचाऱ्यांची परतफेड त्यांच्या पगारातुन करण्यात येईल.

१०. कर्जाची परतफेडीची मुदत २४ महिने इतकी राहील, मात्र ती कोणत्याही परिस्थितीत सभासदाच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपेक्षा जादा राहणार नाही. सदरची परतफेड मासिक हप्त्याने राहील.

११. कर्जाचा व्याजदर द.सा.द.शे. ११.००% इतका राहील. व्याज मासिक स्वरुपात खात्यावर नावे टाकले जाईल. कर्ज थकीत झाल्यास थकीत रकमेवर २% जादा 'दंड' व्याज आकारले जाईल.

१२. कर्जास जामीनदाराची आवश्यकता नाही मात्र सभासदाने यापुर्वी कर्ज घेतले असल्यास सदरचे कर्ज नियमित असावे. ते थकीत असल्यास किंवा मागील कर्जाच्या परतफेडीचा अनुभव समाधानकारक नसल्यास हे कर्ज दिले जाणार नाही.

१३. कर्जास रु.१००/- चा स्टॅम्प पेपर कर्ज करारनाम्यासोबत स्वाक्षरीनीशी जोडावा लागेल.

१४. कर्ज मुदतीत न भरल्यास अथवा थकीत झाल्यास ते सभासदांच्या इतर ठेव खात्यातुन वर्ग करुन बंद करण्यात येईल याबाबतचा हक्क बँकेकडे राहील.

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

**प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.**

१५. सदरचे कर्ज वरील नियमाप्रमाणे पुर्तता करुन देणाऱ्या नियमित सभासदास अथवा बँक कर्मचाऱ्यास घेता येईल.

१६. सदर कर्ज **मंजुर/नामंजुर** करणेचा अधिकार संचालक मंडळास राहील. मात्र कर्ज नामंजुरीबाबतचे कारण सभासदास लेखी स्वरुपात दिले जाणार नाही.

**सदर कर्ज नियमावली संचालक मंडळ सभा दि.२३/०८/२०२० ठराव क्र. १६ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.२५/०८/२०२० पासुन लागु करण्यात येत आहे.**

| (प्रकाश क्षीरसागर) | (अजित आव्हाड) | (सुनिल बच्छाव) |
|---|---|---|
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# निवृत्ती वेतन (पेन्शनर) कर्ज
## (दि.१२/१२/२०२१ पासुन लागू)

१. सदर नियमांस **नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक** या बँकेचे **'निवृत्ती वेतन (पेन्शनर) कर्ज'** असे संबोधण्यात येईल.

२. कर्जाची मागणी करणारा आपल्या बँकेचा सभासद व बँकेमार्फत निवृत्ती वेतन (पेन्शन) घेणारा असावा. फॅमीली पेन्शन घेणारा सभासद यास पात्र असणार नाही.

३. सदर कर्जासाठी एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल तो नियमित सभासद किंवा पेन्शन खाते असणारा सभासद असणे आवश्यक राहील.

४. निवृत्ती वेतन कर्जाची मर्यादा किमान रु.५,०००/- व कमाल रु.१,००,०००/- (अक्षरी रु.एक लाख मात्र) इतकी राहील.

५. निवृत्ती वेतन कर्ज मागणी अर्जावर वारसदारांची संमतीदर्शक स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. घेतलेल्या कर्जाची परतफेड समान २४ मासिक हप्त्यात राहील. तसेच कर्जाचा हप्ता पेन्शन खातेतुन प्रथम प्राधान्याने दरमहा वसुल केला जाईल. कर्ज हप्त्याची वसुली लगेचच पुढील महिन्यापासुन सुरु करण्यात येईल.

६. कर्ज मंजूर करतांना कर्जाचा हप्ता वजा जाता १/३ निवृत्ती वेतन हातात पडणे आवश्यक आहे.

७. निवृत्ती वेतन कर्ज घेतल्यानंतर दुर्दैवाने कर्जदार मयत झाल्यास उर्वरीत कर्जाची परतफेड करण्याची जबाबदारी त्यांचे वारसदार व जामीनदार यांची वैयक्तिक व संयुक्तिक राहील.

८. सदर कर्जाच्या व्याजाचा दर द.सा.द.शे. ११.५०% इतका राहील. काही कारणाने कर्ज थकल्यास थकीत रक्कमेवर २% जादा दंड व्याज आकारण्यात येईल. तसेच व्याजाचा दर कमी / जास्त असा बदल करण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

९. सदर कर्जासाठी बँकेच्या विहीत नमुण्यातील अर्ज परिपुर्ण माहीतीसह, स्टॅम्प पेपर, जामीनदार यांचा फोटो व आवश्यक तेथे स्वाक्षऱ्या इ. माहीती भरुन देणे आवश्यक राहील, नंतरच कर्ज वितरीत केले जाईल.

१०. कर्ज अर्जाची किंमत रु.१०/- अधिक GST रु.०२/- अशी एकुण रु.१२/- इतकी राहील.

वरील नियमांत फेरफार करण्याचा तसेच नवीन नियम घालण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार मा.संचालक मंडळास राहील.

**सदर कर्ज नियमावली संचालक मंडळ सभा दि.११/१२/२०२१ ठराव क्र. १५ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.१२/१२/२०२१ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| (सुरेश पाटील) | (अशोक शिंदे) | (भाऊसाहेब खातळे) |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

## नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# वाहन कर्जाचे नियम (अटी व शर्ती)

## (दि.०१/०९/२०२१ पासुन लागू)

१. बँकेने **दु चाकी (टु व्हीलर)** व **चारचाकी (फोर व्हीलर)** वाहनांसाठी दिलेल्या कर्जास बँकेचे **'वाहन कर्ज'** असे संबोधण्यात येईल.

२. सदर कर्जासाठी फक्त नियमित **'सभासद'** पात्र असेल मात्र यासाठी सभासदाचा सभासद होवुन किमान १ वर्षे इतका कालावधी पुर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

३. बँकेचा कायम सेवक सदरचे कर्ज घेण्यास पात्र राहील तसेच जामीनदार म्हणुन बँकेतील इतर **'कायम सेवेतील'** कर्मचारी चालू शकेल मात्र वरील सर्वांना नियमानुसार नाममात्र सभासद व्हावे लागेल.

४. वाहन खरेदी करण्यासाठी अधिकृत विक्रेते अथवा डिलरचे कोटेशन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. खरेदी करावयाच्या वाहनाच्या किंमतीच्या १०% दुरावा (मार्जिन) रक्कम आपल्या बचत खात्यात कर्ज मंजुरीपुर्वी जमा करावी लागेल किंवा विक्रेत्याला रोख स्वरुपात दिली असल्यास तशी रोख भरणा पावती कर्ज अर्जासोबत जोडावी लागेल.

५. वाहन कर्जाअंतर्गत फक्त नविन वाहनांच्या खरेदीसाठी हे कर्ज दिले जाईल, जुन्या वाहनांसाठी हे कर्ज दिले जाणार नाही.

६. सदर कर्ज मंजुर रकमेच्या किमान २.५% इतके शेअर्स (भाग भांडवल) बँकेत जमा असणे आवश्यक राहील.

७. दुचाकीसाठी रु.१००/- अधिक GST व चारचाकीसाठी रु.१०००/- अधिक GST इतकी प्रोसेसिंग फी व रु.३५०/- एन.ओ.सी. चार्जेस म्हणुन आकारण्यात येईल, सदरची रक्कम स्वतंत्रपणे भरावी लागेल.

८. सदर कर्जासाठी द.सा.द.शे. १०.००% प्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात येईल, थकित रकमेवर २% जादा दंडव्याज आकारण्यात येईल. व्याजाची आकारणी मासिक पध्दतीने करण्यात येवुन खातेवर नावे टाकली जाईल.

९. सदरचे कर्जावरील व्याजाचा दर कमी करणेचा अथवा वाढविणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१०. या प्रकारच्या कर्जाची मर्यादा व मुदत खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | वाहन प्रकार | कोटेशनच्या | कमाल मर्यादा | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | दु चाकी (टु व्हीलर) | ९०% | रु. १ लाख | ३ वर्षे |
| २ | चार चाकी (फोर व्हीलर) | ९०% | रु. १५ लाख | ७ वर्षे |

११. परतफेडीचा कालावधी वर नमूद केल्याप्रमाणे असला तरी तो कोणत्याही परिस्थितीत कर्जदार सभासदाच्या सेवानिवृत्ती तारखेपेक्षा अधिक राहणार नाही.

१२. कमाल मर्यादा वर प्रमाणे असली तरी कोटेशनच्या ९०% किंवा कमाल मर्यादा यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्याच रकमेस कर्ज मंजुरी दिली जाईल. मंजुर कर्ज रक्कम चेक अथवा NEFT / RTGS ने डिलरच्या नावाने अदा करण्यात येईल.

१३. सदर कर्ज मंजुरी वेळी यापुर्वीच्या व नविन घेत असलेल्या कर्जाचा हप्ता धरुन १/३ पगार हातात पडणे आवश्यक आहे. कर्ज अर्जासोबत अलिकडील वेतनाची स्लीप व बँक खातेचा सहा महिने कालावधीचा उतारा जोडावा लागेल.

१४. रु.५०,०००/- पावेतोच्या कर्जासाठी एक नियमित सभासद व रु.५०,०००/- वरील कर्जास दोन नियमित सभासद जामीनदार म्हणुन आवश्यक राहील.

१५. कर्ज मंजुरीसाठी जादा जामीनदार अथवा जादा सहतारण (Colateral Security) घेण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१६. आपणांस सदरचे कर्ज परतफेडीसाठी पगार खाते असणाऱ्या बँकेचे किमान ५ चेक्स प्रतिज्ञापत्रासह बँकेस द्यावे लागतील.

१७. सदर कर्जाचा मासिक हप्ता हा ACH / ECS नेच भरणे आवश्यक राहील त्यासाठी ACH / ECS मॅनडेट फॉर्म (Mandate Form) भरुन दयावे लागेल.

१८. आर.सी. पुस्तकावर आर.टी.ओ. यांचे कार्यालयातुन बँकेचा बोजा (नांव) नोंदवुन आणावयाचा असुन फॉर्म क्र. २९, ३०, ३४, ३५ आदि फॉर्म आपल्या सहीनिशी कर्ज प्रकरणासोबत कर्ज मंजुर झाल्यावर दयावे लागतील.

१९. आर.सी. बुक, टॅक्स् रिसिट, एनव्हाईस, वाहनाची विमा पॉलिसी, स्टॅम्प रिसिट बँकेच्या नांवे डिलर / विक्रेत्यांकडुन घेऊन बँकेत जमा करावे लागेल.

२०. बँकेमार्फत खरेदी केलेल्या वाहनाचा कर्जदार व बँकेच्या संयुक्त नावाने 'कॉम्प्रिहेन्सिव्ह विमा' उतरावावा लागेल. दरवर्षी विमा पॉलिसीचे नुतनीकरण करावे लागेल. सभासदाने खरेदी केलेल्या वाहनाचा विमा काढणेची जबाबदारी कर्जदार सभासदांचीच राहील. सदर कॉम्प्रिहेन्सिव्ह विमा हप्त्याची रक्कम भरल्यानंतर सदर पॉलीसी बँकेत जमा करावयाची जबाबदारी देखील कर्जदाराची राहील.

२१. वाहनावर सहजगत्या दृष्टीस पडेल अशा रितीने **'कर्मचारी बँक, नाशिक'** असा बँकेच्या नांवाचा बोर्ड लावावा लागेल.

२२. कर्ज नियम, अटी / शर्ती यांचा भंग झाल्यास संपुर्ण कर्ज रक्कमेची वसुली मुदतपुर्व केली जाईल तसा बँकेस अधिकार राहील.

२३. वाहन कर्जापोटी तारण असलेल्या वाहनाची चोरी झाल्यास व त्या बद्दलचा क्लेम विमा कंपनीकडुन मंजुर झाल्यास क्लेमपोटी मिळणारी संपुर्ण रक्कम कर्जदाराच्या कर्जखाती जमा करण्यात येईल, उर्वरीत शिल्लक राहीलेली रक्कम भरण्याची जबाबदारी कर्जदार व जामीनदार यांची राहील. काही कारणाने विमा कंपनीकडुन क्लेम नाकारला तर शिल्लक कर्ज रक्कम भरण्याची पुर्ण जबाबदारी कर्जदार व जामीनदार अशी वैयक्तिक व संयुक्तीक स्वरुपाची राहील.

२४. बँकेच्या पुर्व परवानगी शिवाय आपणांस कोणत्याही परिस्थीतीत सदर वाहनाची विक्री करता येणार नाही. बँकेने अशी परवानगी दिल्यास सदरची संपूर्ण रक्कम कर्ज खात्यावर भरुन कर्ज खाते बंद करावे लागेल.

२५. कर्ज नियमांच्या वरील अटी व शर्ती यात फेरबदल करणे, वाढविणे अथवा कमी करणे इ. बाबतचे अधिकार बँकेस राहतील.

**संचालक मंडळ सभा दि.३१/०८/२०२१ विषय क्र. १० अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.०१/०९/२०२१ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(सुरेश पाटील)** | **(दिलीप सलादे)** | **(शिरीष भालेराव)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |

नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक
प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

# गृह कर्ज योजना (नियमावली)

(दि.०१/०१/२०२२ पासुन लागू)

**सर्वसाधारण नियम :**

१. कर्जदार बँकेचा सभासद असावा व तो कायम स्वरुपी नोकरीत असावा.

२. किमान एक वर्ष पुर्ण झालेला सभासदच हे कर्ज घेण्यास पात्र राहील. सदर कर्जाची मंजुरी ही फक्त सभासद यांच्या नावानेच दिली जाईल.

३. विकत घ्यावयाची मिळकत (Housing Property) नाशिक जिल्हयातील असावी.

४. करारनामा संयुक्त नावाने असेल व करारनाम्यावरील दुसरी व्यक्ती सभासद नसेल अशावेळी बँकेच्या लाभात करुन दयावयाचे गहाणखतावर दुसऱ्या व्यक्तीची संमत्तीदार म्हणुन स्वाक्षरी असणे आवश्यक व बंधनकारक राहील.

५. सदरचे कर्ज - नवीन फ्लॅट / रो हाऊस / नवीन घर / बंगला विकत घेणे इत्यादी किंवा अन्य बँकेतुन घेतलेले गृहकर्ज आपल्या बँकेत वर्ग (Take Over) करणे इ. कारणा करीता गृह कर्ज मंजुर केले जाईल.

**कर्ज मंजुरी मर्यादा :**

१. मालमत्तेचे नोंदणीकृत साठेखत रक्कमेच्या कमाल ९०% इतकी रक्कम किंवा

२. कर्जाची कमाल मर्यादा रु. ५०.०० लाख इतकी रक्कम किंवा

३. कर्जदाराच्या सर्व कपाती (EPF / GF व इतर ठेव वगळुन) व या कर्जाचा हप्ता वजा जाता एकुण वेतनाच्या १/३ हातात पडेल यानुसारच येणारी रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल. तितकीच रक्कम कर्ज मंजुरीस पात्र राहील.

**कर्जासाठी घेण्यात येणारे तारण :**

१. विकत घेण्यात येणारी मिळकत बँकेच्या लाभात नोंदणीकृत गहाणखताने (Regd. Mortgage) तारण दयावे लागेल.

२. बँकेचे सभासद असलेले दोन सक्षम जामीनदार. (सेवा किमान १५ वर्षे बाकी असणे आवश्यक राहील.)

**व्याजदर :**

१. द.सा.द.शे. ८.९०% मासिक आकारणी पध्दतीने.

२. थकीत रक्कमेवर २.००% जादा दंडव्याज.

**परतफेड कालावधी :**

परतफेडीचा कालावधी हा कर्जदाराच्या सेवानिवृत्तीच्या कालावधी इतका किंवा जास्तीत जास्त २० वर्षे (२४० महिने) इतका राहील.

**परतफेड रक्कम :**

सदर कर्जाची परतफेड ही फक्त ECS / ACH व्दारे समान मासिक हप्त्यानेच करण्यात येईल.

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.

**आवश्यक कागदपत्र :**

**नवीन फ्लॅट खरेदी**

१. कर्ज मागणी अर्ज.

२. जमिनीचा ७/१२ अद्यावत उतारा.

३. ६ ड चा उतारा मागील ३० वर्षांच्या नोंदीसह.

४. NA (बिगरशेती) ऑर्डर (सत्यप्रत)

५. कॉरपोरेशन / नगरपालिका / ग्रामपालिका कार्यालयातील इतारतीचा मंजूर नकाशा (Blue Print)

६. कॉरपोरेशन / नगरपालिका / ग्रामपालिका कार्यालयातील बांधकाम मंजूरी पत्र.

७. बिल्डर / विक्रेता बरोबर केलेले नोंदणीकृत साठेखताची मुळ (Original) प्रत.

८. बिल्डर / विक्रेत्याला आगाऊ रक्कमा दिलेल्या मुळ पावत्या.

९. प्लॉट Development तत्वातर घेवुन बांधकाम होत असल्यास जमिन मालक व बिल्डर यांच्यात झालेला करार (Development Agreement) व Power of Attorney (सत्यप्रत)

१०. बँकेच्या पॅनलवरील Advocate कडील मालमत्तेचा सर्च रिपोर्ट.

११. अन्य बँकेतून गृह कर्ज खाते वर्ग करुन घ्यावयाचे असल्यास वरीलप्रमाणे लागू असलेले सर्व कागदपत्र सत्यप्रत व कर्ज खात्याचा अदयावत उतारा तसेच बँकेचे पत्र.

**शाखास्तरावरील कामकाज :**

१. गृहकर्ज मागणीचे कारण विचारात घेवुन आवश्यक ती सर्व कागदपत्रे पुर्ण करुन व तसेच आवश्यक तेथे कर्जदार, संमत्तीदार व जामीनदार यांच्या सहया घेण्यात याव्यात.

२. शाखा व्यवस्थापक कागदपत्रांची सत्यता पडताळुन पाहतील त्यानंतर प्रत्यक्ष जागेवर भेट देवुन कामाचे स्वरुप व Stage of Work याची पाहणी करतील तसेच त्याचा फोटो घेतील व त्याप्रमाणे पाहणी अहवाल (Pre Sacntion Visit Report) तयार करुन तो दप्तरी ठेवतील.

३. कर्जदाराचा CIBIL Report कर्ज अर्जासोबत जोडण्यात यावा.

४. सर्व कागदपत्र व पहाणी अहवाल, फोटो इ. शिफारशीसह कर्जप्रकरण शाखा व्यवस्थापक प्रशासकीय कार्यालयाकडे मंजूरी करीता सादर करतील.

**प्रशासकीय कार्यालयातील कामकाज :**

१. शाखेकडुन कर्ज प्रकरण आल्यानंतर कर्ज विभागात कागदपत्रांची छाननी केली जाईल व काही अपुर्तता असल्यास शाखेमार्फत त्याची पुर्तता करण्यात येईल.

२. कर्ज प्रकरण पुर्ण झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी त्यांचा शेरा व शिफारस करतील.

३. संचालक मंडळ / कर्ज वितरण उपसमिती सभेवर सदर प्रकरण मंजुरीसाठी ठेवण्यात येईल.

४. संचालक मंडळ / कर्ज वितरण उपसमितीवरील मंजुरी नंतर कर्ज वितरणाकरीता कर्ज प्रकरण योग्य ते शेरे अटी व शर्तीसह शाखेकडे पाठविले जाईल.

५. कर्ज मंजुरी पत्रावर नमूद केलेल्या सर्व अटींची पुर्तता करुन घेवूनच कर्ज वितरणाची कार्यवाही करण्यात येईल.

**शाखास्तरावरील कार्यवाही :**

१. कर्ज मंजुरी मिळाल्यानंतर कर्जदारास कर्ज मंजुरीपत्र देणे.

२. तारण घेणाऱ्या मालमत्तेचे (जी मालमत्ता विकत घेणार आहे ती मालमत्ता) संयुक्त नावाने बँकेच्या पॅनलवरील वकीलाकडुन नोंदणीकृत गहाणखत (Regd. Mortgage) करुन घेणे.

# नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक

**प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.**

**शाखेत खालीलप्रमाणे कागदपत्र करुन घेणे :**

१. कर्ज मंजुरी पत्रावर कर्जदार व जामिनदार यांच्या सहया घेणे.
२. वचनचिठ्ठीवर कर्जदार व दोन जामिनदार यांच्या सहया घेणे.
३. कर्ज करारनामा (रु.१०० स्टॅम्पवर) कर्जदार व दोन जामिनदार यांच्या सहया घेणे.
४. नोंदणीकृत गहाणखत (Regd. Mortgage) करुन मुळ प्रत कर्ज प्रकरणासोबत सुरक्षित ठेवावी.
५. ७/१२ उतारा व नोंदणीकृत गहाणखताची सत्यप्रत जोडुन संबंधीत क्षेत्रातील तलाठी कार्यालयाकडे, बँकेच्या कर्जाची (बोजाची) नोंद करण्याकरीता Reg. AD Post / Hand Delivery पत्र पाठविणे त्याची पावती स्थळप्रतीस जोडून दप्तरी ठेवणे.

**गृहकर्ज प्रकरणाबरोबर जोडावयाची कागदपत्र :**

१. जागेचा ७/१२ चा खाते उतारा (मुळ प्रत)
२. ३० वर्षांच्या नोंदीसह ६ड चा उतारा.
३. जागेचा बिगरशेती परवानगी (N.A. Order)
४. जागेचा (प्लॉट नंबर) चा मंजूर नकाशा (Blue Print)
५. बांधकामाचा मंजूर नकाशा (Blue Print)
६. बांधकाम परवानगी दाखला.
७. बँकेच्या वकीलाकडील Property Search Report (मुळ प्रत)

**वरील सर्व कागदपत्र अनिवार्य आहेत.**

**अन्य कागदपत्र :**

१. मिळकत जुनी असल्यास बँकेच्या अधिकृत मुल्यांकन कारांकडुन करुन मुल्यांकन दाखला सोबत जोडणे आवश्यक राहील.
२. ------------------------------------------------------------------------
३. ------------------------------------------------------------------------

**संचालक मंडळ सभा दि.२५/१२/२०२१ विषय क्र. ११ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.०१/०१/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(सुरेश पाटील)** | **(अशोक शिंदे)** | **(भाऊसाहेब खातळे)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्ष** | **अध्यक्ष** |